# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१४/०७/२०२२

## <u>प्रेसनोट</u>

केंद्र व राज्य शासनाच्या सूचनांना अनुसरून राज्यामध्ये व त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीचा दुसरा डोस घेतल्यानंतर ९ महिन्यांच्या अंतराने प्रिकॉशन डोस देण्यात येत आहे. राज्य शासनाच्या सुधारित सूचनांनुसार यामध्ये बदल करण्यात येत असून दिनांक १५ जुलै,२०२२ रोजीपासून **<u>दुसरा डोस व प्रिकॉशन डोस</u>** यामधील अंतर **<u>९ महिन्यांऐवजी ६ महिने</u>** करण्यात येत आहे.

तसेच शासनाच्या 'जन अभियान' अंतर्गत **<u>१८ ते ५९ वर्षे</u>** वयोगटातील लाभार्थ्यांना दिनांक <u>१५ जुलै, २०२२ ते ३० सप्टेंबर, २०२२</u> रोजी पर्यंत शासकिय लसीकरण केंद्रांवर प्रिकॉशन डोसचे मोफत लसीकरण करण्यात येईल.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**